साप्ताहिक

# परळी परिसर

Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25

* परळी वैजनाथ * सोमवार, दि. ०४ ऑगस्ट २०२५ * पाने-४ * २/- ₹ www.parliparisar.com

शालेय स्टेशनरी व विविध प्रकारच्या आकर्षक छपाईसाठी...
न्यू सुधांशू प्रिंटर्स
श्रीनाथ चित्रमंदिरच्या मागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, Mob.9881244075
कापडी पिशव्या छापून मिळतील.

## वैद्यनाथ बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीसाठी प्रचार सुरू

### रविवारी होणार मतदान; तेरा जागेसाठी सोळा उमेदवार रिंगणात

परळी वैजनाथ, (बातमीदार):- नागरी सहकारी बँकेच्या क्षेत्रात मराठवाड्यात अग्रेसर असलेल्या येथील वैद्यनाथ नागरी सहकारी बँकेच्या येत्या १० ऑगस्टला होणाऱ्या संचालक मंडळाच्या निवडणुकीसाठी प्रचार सुरू झाला असून सभासद मतदारांच्या प्रत्यक्ष भेटीवर भर दिला जात आहे.

संचालकांच्या एकूण १७ जागेसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला होता. त्यापैकी विद्यमान संचालिका माजी खासदार डॉ.प्रितम गोपीनाथराव मुंडे, माधुरी योगेश मेनकुदळे यांची महिला मतदार संघातून बिनविरोध निवड झाली आहे तर इतर मागासवर्गीय मतदार संघातून अनिल दिगंबरराव तांदळे व अनुसुचित जाती जमाती मतदार संघातून विनोद गणपतराव जगतकर यांची बिनविरोध निवड झाली आहे. चार जागा बिनविरोध निवडल्या गेल्याने आता एकूण तेरा जागेसाठीच निवडणूक प्रक्रिया होणार आहे. सर्वसाधारण मतदार संघातून संचालकांच्या १२ जागेसाठी चौदा उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत तर




भटक्या विमुक्त मतदार संघातून एका जागेसाठी दोन उमेदवार निवडणूक लढवत आहेत. तेरा जागेसाठी एकूण सोळा उमेदवार निवडणूक लढवत आहेत. त्यात विद्यमान अध्यक्ष विनोद सामत यांच्यासह संदीप लाहोटी, प्रकाश जोशी, प्रविण देशपांडे, महेश्वर निर्मळे, सुशांत लोमटे, विजय वाकेकर, मनमोहन कलंत्री, अमोल डुबे, कुलभुषण जैन, बाबासाहेब शिंदे, वैजनाथ धंपलवार, राजेंद्र लोमटे, डॉ.राजाराम मुंडे आदी उमेदवारांचा समावेश आहे. तर भटक्या विमुक्त मतदार संघाच्या एका जागेसाठी विद्यमान संचालक रमेश कराड व युवक नेते राजेभाऊ फड हे निवडणूक लढवत आहेत. बँकेत सत्ता असलेल्या उमेदवारांचा लोकनेते गोपीनाथराव मुंडे जनसेवा पॅनल व विरोधकांचा वैद्यनाथ परिवर्तन पॅनल यांच्यात ही लढत होत आहे. दरम्यान, येत्या रविवारी (दि.१०) सकाळी ८ ते संध्या ४ वा.पर्यंत मतदान होणार असून १२ ऑगस्टला सकाळी ८ वाजल्यापासून मतमोजणीला सुरुवात होवुन त्यानंतर निकाल जाहीर होणार आहे. **

## श्री वैद्यनाथ ज्योतिर्लिंगाच्या दर्शनासाठी भाविकांची वाढती गर्दी

परळी वैजनाथ, (बातमीदार):- देशभरातील पाचवे ज्योतिर्लिंग म्हणून भाविकांत ओळख असलेल्या येथील प्रभू वैद्यनाथ ज्योतिर्लिंगाच्या श्रावण मास उत्सवानिमित्त दर्शनासाठी दररोज हजारो भाविकांची मंदिरात गर्दी होत आहे.

यंदा २५ जुलैपासून श्रावणमास उत्सवास सुरुवात झाली असून दररोज हजारो भाविक श्री वैद्यनाथ ज्योतिर्लिंगाचे दर्शन घेवून अभिषेकपूज करत आहेत.

पहिल्या श्रावणी सोमवार (दि.२८) दिवसभरात दोन लाखावर भाविकांनी श्री वैद्यनाथाचे दर्शन घेतले. भाविकांचे दर्शन सुलभ व्हावे म्हणून स्त्री, पुरूष अशा वेगवेगळ्या रांगा करण्यात आल्या आहेत. शंभर रुपये देणगी देवून विशेष दर्शनाची व्यवस्था मंदिरात केली गेली आहे. यासाठी वेगळी रांग मंदिरात आहे. पहाटे श्रीची काकडा आरती, अभिषेक पूजा होवून दर्शनाला सुरुवात होत आहे. भाविकांची गैरसोय होवू नये म्हणून देवस्थान संस्थेने दर्शन रांगेच्या मार्गावर मंडप टाकले आहेत, पिण्याच्या पाण्याची सोयही केली आहे, पावसात भाविक भिजू नयेत म्हणूनही काळजी



घेतली गेली आहे, दर्शन व्यवस्था चोख व्हावी म्हणून जागोजाग शंभरावर सीसीटीव्ही कॅमेरे लावले आहेत, पार्कींगचीही व्यवस्था मंदिर परिसरात केली गेली आहे. दर्शन व्यवस्था चोख व्हावी व भाविकांची गैरसोय होवू नये म्हणून देवस्थान संस्थेचे जेष्ठ विश्वस्त राजेश देशमुख, प्रा.बाबासाहेब देशमुख यांच्यासह त्यांचे सर्व सहकारी, कर्मचारी परिश्रम घेत आहेत.

दरम्यान, श्रावणमास उत्सवाच्या पार्श्वभूमीवर मंदिर परिसरात चोख पोलिस बंदोबस्त आहे. भाविकांच्या गर्दीमुळे मंदिर परिसर गजबजला आहे.

दर श्रावण सोमवारी आ.धनंजय मुंडे यांच्या नाथ प्रतिष्ठाणच्या वतीने मंदिरावर पुष्प सजावट केली जात आहे. यामुळे मंदिर परिसराचे वैभव अधिकच देखणे झाले आहे तर श्रावणानिमित्त मंदिरावर विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. दरम्यान, परळी शहर व परिसरातील विविध शिव मंदिरात श्रावणानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. येथेही दर्शनासाठी भाविकांसाठी गर्दी होत आहे. ***

## मंथन परीक्षेत मोक्षदा पट्टणकुडे केंद्रातून दुसरी

परळी वैजनाथ, (बातमीदार):- अहिल्यानगर येथील मंथन सामान्यज्ञान परीक्षा व मंथन वेल्थफेअर फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने गेल्या फेब्रुवारीत घेण्यात आलेल्या मंथन सामान्यज्ञान राज्यस्तरीय परीक्षेत येथील उर्जानगर वसाहतीतील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या नवीन प्राथमिक शाळेतील इयत्ता तिसरीत शिकणारी विद्यार्थीनी कु.मोक्षदा अमृत पट्टणकुडे परळी केंद्रातून दुसरी आली आहे. तिला या परीक्षेत १५० पैकी १२४



गुण मिळाले आहेत. तिच्या या यशाबद्दल शालेय समितीचे अध्यक्ष नानासाहेब सोळंके व इतर सर्व सदस्य यांच्यासह मुख्याध्यापक डी.जी.शिंदे, पर्यवेक्षक उमेश देशमुख, एल.आय.वाकडे व इतर शिक्षकवृंदांनी अभिनंदन केले आहे. दरम्यान, या यशाबद्दल शाळेत तिचा ज्येष्ठ शिक्षिकार आर.पी.निटुरे मॅडम, ज्येष्ठ शिक्षक विनोद देशमुख यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. यावेळी सर्व शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते. **

## अकोल्यात पत्रकारांवर झालेल्या हल्ल्याचा 'न्यूज पेपर ऑफ इंडिया' च्या वतीने निषेध

अकोला (बातमीदार):- अकोल्यातील पत्रकारांवर केवळ बातमी प्रसिद्ध केल्याच्या रागातून कोयत्याने थेट प्राणघातक हल्ला झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. पाच ते सहा हल्लेखोरांनी मिळून स्थानिक वृत्तपत्राच्या संपादकासह चार जणांवर कोयत्याने सपासप वार केले. ही गंभीर घटना अकोल्यातील जनता भाजी बाजार परिसरात रविवारी सायंकाळच्या सुमारास घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, अलीकडेच अकोला पोलिसांनी दोन गुन्हेगाऱ्यांना तडीपार केलं होतं. या घटनेबाबत स्थानिक वृत्तपत्रात बातमी प्रसिद्ध करण्यात आली. ही बातमी संबंधित गुन्हेगारी टोळीच्या रागाचा विषय ठरली. राग अनावर झालेल्या टोळक्याने थेट बातमी प्रसिद्ध करणाऱ्या पत्रकारांचा शोध घेत, त्यांच्यावर भाजी बाजारात कोयत्याने सपासप वार केले.

या हल्ल्यात संपादकासह चार जण गंभीर जखमी झाले असून, सर्वांना तातडीने खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. काही जखमींची प्रकृती चिंताजनक आहे, अशी माहिती रुग्णालय प्रशासनाने दिली आहे.

पत्रकारितेच्या क्षेत्रात कार्यरत असलेल्या व्यक्तींवर अशा प्रकारे थेट हल्ला होणे म्हणजे अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर आणि पत्रकारितेच्या मूल्यांवर झालेला थेट घाव मानला जात आहे. या घटनेनंतर अकोला परिसरात खळबळ उडाली असून, पत्रकार संघटनांत संतापाची लाट उसळली आहे.

घटनेची माहिती मिळताच काँग्रेसचे आमदार साजिद खान पठाण यांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी जखमी पत्रकारांची रुग्णालयात भेट घेऊन प्रकृतीची विचारपूस केली. तसेच, पोलिसांच्या निष्क्रीय भूमिकेवर सडकून टीका करत, ही घटना केवळ व्यक्तिविशेषावर नव्हे तर लोकशाहीवर हल्ला आहे, असे विधान केले.

या प्रकरणी अकोला शहर पोलीस ठाण्यात कलम ३०७ (खुनाचा प्रयत्न) अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला आहे. आरोपींचा शोध घेण्यासाठी विशेष पथक नेमण्यात आले आहे. पोलिसांकडून परिसरातील सीसीटीव्ही फुटेज आणि गोपनीय माहितीच्या आधारे तपास सुरू आहे. या भ्याड हल्ल्याचा असोसिएशन ऑफ स्मॉल अँड मिडीयम न्यूज पेपर ऑफ इंडियाचे प्रदेश अध्यक्ष प्रदीप कुलकर्णी यांनी जाहीर निषेध व्यक्त केला असून आरोपींना तात्काळ अटक करण्याची मागणी केली आहे. हा हल्ला पत्रकारांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर आहे लोकशाही वर आहे. तेव्हा या घटनेचा जेवढा निषेध करावा तेवढा थोडाच आहे अशा शब्दात प्रदीप कुलकर्णी यांनी या घटनेचा निषेध व्यक्त केला आहे. **

## शामसुंदर महाराज सोन्नर यांना क्रांतिसिंह नाना पाटील पुरस्कार

बीड (बातमीदार):- सुप्रसिद्ध कीर्तनकार, जेष्ठ पत्रकार तथा संवेदनशील कवी ह. भ. प. श शामसुंदर महाराज सोन्नर यांना क्रांतिसिंह नाना पाटील आध्यात्मिक पुरस्कार जाहीर झाला असून या पुरस्काराचे वितरण रविवार, दि. ३ ऑगस्ट रोजी बीड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात होणार आहे, अशी माहिती क्रांतिसिंह नाना पाटील शेतकरी विकास प्रतिष्ठानचे वतीने मोहन गुंड यांनी दिली.

क्रांतीसिंह नाना पाटील शेतकरी विकास प्रतिष्ठानच्या वतीने दिले जाणारे पुरस्कार जाहीर झाले आहेत. अध्यात्मिक कार्यासाठी दिला जाणारा प्रबोधन पुरस्कार



यावर्षी शामसुंदर महाराज सोन्नर यांना जाहीर झाला आहे. शामसुंदर महाराज कीर्तन आणि प्रवचनाच्या माध्यमातून समाजातील विविध प्रश्नावर भाष्य करतात. शेतकऱ्यांना आत्महत्येपासून परावृत करणे स्त्री भ्रूणहत्ये विरोधात जागृती करणे, कैद्याचे समुपदेशन करणे असे प्रबोधनात्मक उपक्रम शामसुंदर महाराज राबवित असतात. सध्या ते कीर्तनातून संविधानाचा जागर करीत आहेत. जगद्गुरु तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळ्यात त्यांची संविधान दिंडी असते. त्यांच्या या प्रबोधनकार्याची दखल घेऊन त्यांना क्रांतिसिंह नाना पाटील पुरस्कार जाहीर झाला आहे. ***

# संगीत वाद्यांच्या दुनियेत विद्यार्थी रमून गेले

## नवीन प्राथमिक शाळेत 'दप्तरविना शाळा' उपक्रम






परळी वैजनाथ, (बातमीदार):- मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाने दर शनिवारी सुरू केलेल्या 'दप्तरविना शाळा' या उपक्रमांतर्गत शनिवारी (दि.२) येथील उर्जानगर वसाहतीतील नवीन प्राथमिक शाळेत 'ओळख वाद्यांची' हा उपक्रम घेण्यात आला. विविध संगीत वाद्यांची माहिती जाणून घेत विद्यार्थ्यांनी वाद्य वाजवली, ताल धरला, संगीतावर गाणीही म्हटली. या उपक्रमास विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद मिळाला.

शाळेच्या सभागृहात हा कार्यक्रम झाला. अखिल भारतीय वारकरी भजनी मंडळाचे अध्यक्ष व उत्तरेश्वर गुरूमाऊली संगीत विद्यालयाचे संचालक रामेश्वर महाराज कोकाटे, पालक प्रतिनिधी मारोती भरले यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम झाला. मृदंग, तबला, ढोलकी आदी चामडी वाद्यांसह तंबोरा, संगीत पेटी (हार्मोनियम) इतर संगीत वाद्यांची ओळख श्री कोकाटे यांनी विद्यार्थ्यांना करून दिली. प्रत्येक वाद्य वाजऊन दाखवले. कविता, गाणी म्हणणाऱ्या शाळेतील विद्यार्थ्यांच्या कविता, गाण्यांना यावेळी संगीत दिले. संगीतावर गाणी म्हणताना विद्यार्थ्यांनी ठेका धरला, गाणी गायीली.

या उपक्रमात शाळेतील शिक्षकांनीही सहभाग घेत रचना सादर केल्या. त्यास श्री कोकाटे यांनी संगीतसाथ दिली. कु.आरोही जोशी या विद्यार्थीनीने संगीत वाद्य वाजवत रचना सादर केल्या. त्यास चि.आदेश जाधव या तिसरीतील विद्यार्थ्यांनी तबला वाजवत साथ दिली. या संगीताच्या दुनियेत विद्यार्थी रमून गेली. या कार्यक्रमाचे उद्घाटन पालक प्रतिनिधी श्री भरले यांच्या हस्ते करण्यात आले. प्रास्ताविक व सुत्रसंचालन भागवत मुंडे सर यांनी केले. या उपक्रमाबद्दल ज्येष्ठ शिक्षक एल.आय.वाकडे यांनी माहिती दिली. आभार प्रदर्शन विनोद देशमुख यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आर.पी.निटुरे मॅडम, श्री चौरे सर, आयोध्या राऊत मॅडम, सौ.गंगणे मॅडम, सौ.शुभांगी मुंडे मॅडम आदींसह अभिजीत डिकले, हरि मुंडे आदींनी परिश्रम घेतले. दरम्यान, यावेळी श्री कोकाटे, श्री भरले यांच्या उपस्थितीत शाळेच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी पर्यवेक्षक उमेश देशमुख, श्री शिंगणे, श्रीरामे, श्री घोलप आदींसह विद्यार्थी, शिक्षक उपस्थित होते. ***




## धर्मापुरीकर प्रतिष्ठानच्या वतीने विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

परळी वैजनाथ, (बातमीदार):- आम्ही धर्मापुरीकर प्रतिष्ठानच्या वतीने धर्मापुरी येथील विविध जिल्हा परिषद शाळांमध्ये विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमात जिल्हा परिषद माध्यमिक शाळा धर्मापुरी, धर्मापुरी,जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नं २ धर्मापुरी, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा माणिकनगर धर्मापुरी आणि जिल्हा परिषद प्राथमिक शाळा डागवस्ती धर्मापुरी या शाळांचा समावेश होता.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन प्राचार्य दि.ना फड यांच्या संकल्पनेतून आम्ही धर्मापुरीकर प्रतिष्ठानने पुढाकार घेत विद्यार्थ्यांना पेन, पेन्सिल, वह्या, रजिस्टर,दप्तर कंपास पेटी, रोलिंग पुठ्ठा, पॅड, स्केल, स्केच पेन बॉक्स, पाणी बॉटल आदी साहित्याचे वाटप केले. या उपक्रमाचा उद्देश ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक संसाधने पुरवून त्यांचा आत्मविश्वास वाढवणे हा होता.

'ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही दर्जेदार शिक्षणाच्या संधी मिळाव्यात, हा आमचा प्रयत्न आहे. समाजासाठी सकारात्मक योगदान देणे हेच गुणवंतांना मोटिवेट करणे प्रतिष्ठानचे मुख्य ध्येय आहे.''प्रतिष्ठानने आजपर्यंत तीन लाखांहून अधिक पाचशे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप व दहावी बारावीच्या विद्यार्थ्यांचे स्पर्धा परीक्षा सेमिनार, दहावी बारावी मध्ये प्रथम द्वितीय तृतीय आलेल्या व स्पर्धा परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आल्याचे आम्ही धर्मापुरीकर प्रतिष्ठानचे सक्रिय सदस्य बालासाहेब दहिफळे यांनी सांगितले. कार्यक्रमाला आम्ही धर्मापुरीकर प्रतिष्ठानचे महादेव फड सर महादेव डॉ.विष्णू दहिफळे व इतर सदस्य, शिक्षकवृंद, पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक करण्यात येत आहे. **

## कृषिकुल येथे माध्यम प्रतिनिधींशी संवाद या कार्यक्रमाचे आयोजन;मयंक गांधी यांची उपस्थिती



परळी वैजनाथ (बातमीदार):- विकासपुरुष आणि सामाजिक कार्यकर्ते मयंक गांधी यांनी ग्लोबल विकास ट्रस्टची स्थापना करून या संस्थेच्या माध्यमातून अनेक लोकोपयोगी कामे केली आहेत. आजमितीस ग्लोबल विकास ट्रस्ट आणि कृषिकुल संस्थांच्या माध्यमातून राज्यभर आणि राज्याच्या बाहेर अनेक सामाजिक कामे केली जात आहेत. या सर्व गोष्टींच्या अनुषंगाने 'संवाद माध्यम प्रतिनिधींशी' या विशेष कार्यक्रमांचे बुधवार, दिनांक १३ ऑगस्ट रोजी दुपारी १२ वाजता आयोजन करण्यात आले आहे.

कार्यक्रमास मयंक गांधी यांची उपस्थिती असणार असून, बीड जिल्ह्यातील सर्व पत्रकार, संपादक तसेच सर्व माध्यमांच्या प्रतिनिधींना निमंत्रित करण्यात आले आहे.

ग्लोबल विकास ट्रस्ट आणि कृषिकुल या संस्थेच्या माध्यमातून शेतकरी केंद्रस्थानी ठेवत विविध कामे राज्यभर आणि राज्याच्या बाहेरही केली जात आहेत. ज्यामध्ये जलसंधारण, मृदा संधारण, शेतीचे आधुनिकीकरण आणि शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम संस्थेच्या माध्यमातून घेतले जातात. राज्याच्या विविध भागांतील शेतकरी शेतीच्या आधुनिक तंत्रज्ञानाचे धडे इथे घेऊन शाश्वत शेतीकडे वळले आहेत. परळी तालुक्यातील सिरसाळा जवळ उभारलेल्या ग्लोबल विकास ट्रस्टच्या संकुल परिसरात विविध प्रयोगशाळा, प्रत्यक्ष फळबाग प्लॉट्स, गोशाळा तसेच शेतकरी प्रशिक्षण केंद्र उभे करण्यात आले आहे. संस्थेचे संस्थापक मयंक गांधी या सर्व विषयाच्या अनुषंगाने सर्व पत्रकार, संपादक तसेच मध्यम प्रतिनिधी बांधवांशी संवाद साधणार आहेत. यानुषंगाने बुधवार, दिनांक १३ ऑगस्ट २०२५ रोजी १२ वाजता ''संवाद माध्यम प्रतिनिधींशी'' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. बीड जिल्ह्यातील सर्व पत्रकार, संपादक तसेच सर्व माध्यमांच्या प्रतिनिधींना या कार्यक्रमासाठी निमंत्रित करण्यात आले आहे. निमंत्रित सर्वांनी कार्यक्रमास आवर्जून उपस्थित रहावे असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. ***

## आणीबाणीत लढा देणाऱ्या व्यक्तींना वाढीव मानधन

### पात्र लाभार्थ्यांनी २५ सप्टेंबरपर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन

बीड, (जिमाका):- आणीबाणी १९७५ ते १९७७ च्या कालावधीत कारावास भोगलेल्या व्यक्ती, त्यांचे हयात जोडीदारासाठी असलेल्या मानधनात शासनाने वाढ केली आहे. यासह शासनाच्या धोरणात सुधारणा केली आहे. यासंबंधीचा शासन निर्णय २७ जून २०२५ रोजी निर्गमित केला आहे. पात्र लाभार्थ्यांनी २५ सप्टेंबर २०२५ पर्यंत विहित नमुन्यात अर्ज सादर करावेत. त्यानंतर प्राप्त अर्जांचा विचार करण्यात येणार नसल्याचे जिल्हा प्रशासनाने कळवले आहे.

एक महिन्यापेक्षा जास्त कारावास भोगलेल्या आणीबाणीधारकांना मासिक रु. २० हजार, त्यांच्या पश्चात त्यांच्या पत्नी, पतीस रु. १० हजार, एक महिन्यापेक्षा कमी कारावास भोगलेल्या आणीबाणीधारकास मासिक रु. १० हजार, त्यांच्या पश्चात त्यांच्या पत्नी, पतीस रु. पाच हजार मानधन अनुज्ञेय असणार आहे. मानधनासाठी अर्जदाराचे अटकेच्यावेळी किमान १८ वय असण्याची अट आणि १४ डिसेंबर २०२३ रोजीचे शासन पत्र क्र. संकीर्ण १९२२/प्र.क्र.१९७/स्वासैक-१ देखील या शासन निर्णयान्वये रद्द करण्यात आले आहे.

आणीबाणीत कारावास भोगलेली व्यक्ती ०२ जानेवारी २०१८ पूर्वी हयात नसेल, तर त्यांच्या पश्चात असलेल्या हयात जोडीदाराला (पती/पत्नी) मानधन मिळवण्यासाठी परिशिष्ट 'ब' मधील शपथपत्र अर्जासोबत जोडून जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करावे लागेल. अशा प्रकरणांमध्ये मानधन मंजुरीचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना असतील. आणीबाणी काळात कारावास भोगलेली व्यक्ती किंवा त्याची पत्नी, पती, यापैकी कोणीही एक हयात असेपर्यंतच मानधन अनुज्ञेय असेल. त्यानंतर कायदेशीर वारस मानधन किंवा थकबाकीसाठी अर्ज करू शकणार नाहीत, असे शासन निर्णयात नमूद आहे. **

(पान ३ वरून)...**नवे तहसीलदार**

आली आहे. बऱ्याच काळापासून परळी तहसील कार्यालयातील नायब तहसीलदार पदे रिक्त होती. परिणामी, नागरिकांच्या महसूल व निवडणूक संबंधित कामांमध्ये अडथळे निर्माण होत होते. ही रिक्त पदे भरल्यामुळे आता कामकाज अधिक कार्यक्षमतेने पार पाडले जाणार आहे. या नियुक्त्यांमुळे तालुक्यातील प्रशासकीय कामांना चालना मिळणार असून, या निर्णयाबद्दल माजी मंत्री आ.धनंजय मुंडे यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे आभार मानले आहेत. ***

**खरय..**
**पण...**

माणे वळून
न
पाहणारे
पुढे जाऊन
धडपडतात.!

**सा.परळी परिसर चे**
**वार्षिक वर्गणीदार व्हा!**
**-० अंकासाठी संपर्क ०-**
**मो.९४२२३२८४९३**

**हसरा**
**कोपरा..!**

**ज्याला तुमची**
**लफडी**
**माहीत आहे,**
**तोच तुमचा**
**'खरा मित्र'**

संपादकीय...

# इतर प्रश्नही मार्गी लागावेत.!

स्वातंत्र्य पूर्व काळापासून मराठवाड्यात रेल्वे धावत आहे. हैदराबाद-परळी व हैदराबाद-औरंगाबाद (छ.संभाजीनगर) अशी रेल्वे सेवा सुरूवातीला येथे सुरू झाली. परळी-हैदराबाद हा मार्ग मराठवाड्यातील पहिला रूंद (ब्रॉडगेज) रेल्वे मार्ग म्हणून ओळखला जातो. पुढे परळी-परभणी हा मार्ग कार्यान्वित झाला. हा मार्ग मीटरगेज होता. यामुळे परळी-परभणी, औरंगाबाद, नांदेड येथे रेल्वेने ये-जा करणे सोयीचे झाले. नव्वदच्या दशकात परळी-परभणी या मार्गाचे रूंद रेल्वे मार्गात रूपांतर झाले. दरम्यानच्या काळात मराठवाड्यात इतर काही रेल्वे मार्ग तयार झाले. रेल्वे स्थानकाचे बांधकाम, आधुनिकीकरण करण्यात आले. रेल्वेच्या फेऱ्या वाढल्या. परंतु ज्या गतीने मराठवाड्यात रेल्वेचा व मार्गाचा विकास व्हायला पाहिजे होता. तसा तो झाला नाही. अशी खदखद येथे सातत्याने व्यक्त होताना दिसते.

लातूररोड ते लातूर-कुर्डूवाडी असा रेल्वे मार्ग व्हावा म्हणून अनेक दिवस संघर्ष करावा लागला. बऱ्याच वर्षाच्या मागणीनंतर या मार्गाला रेल्वे मंत्रालयाने हिरवा झेंडा दाखवला. मागच्या पंचेवीस-तीस वर्षापासून परळी-बीड-नगर (अहिल्यानगर) या रेल्वे मार्गाचा प्रश्न आहे. मोठ्या संघर्षानंतर या मार्गाला मंजुरी मिळाली व काम सुरू झाले. या मार्गाचे काम सुरू झाल्यानंतर ज्या गतीने व्हायला पाहिजे तसे होताना दिसत नाही. गेल्या अनेक वर्षापासून हे काम सुरू आहे. परंतु आजपर्यंत नगरहून बीड पर्यंतही रेल्वे येऊ शकली नाही. या मार्गाचे काम परळीपर्यंत कधी होईल व या मार्गावरून परळी-बीड-नगर अशी रेल्वे सेवा कधी सुरू होईल हे आज तरी निश्चितपणे सांगता येत नाही. या मार्गाचे काम कासव गतीने सुरू आहे. मधल्या काळात या कामाला गती मिळावी व काम लवकर पूर्ण व्हावे म्हणून परळीहून कामाला सुरूवात करण्याचे ठरले. तसे उद्घाटनही झाले. परंतु परळीहून म्हणावे त्या गतीने काम होऊ शकले नाही.

घाटनांदूर-अंबाजोगाई, परळी-सोनपेठ-पाथरी, सोलापूर-बीड-औरंगाबाद अशा नवीन रेल्वे मार्गाची मागणी नागरिकांकडून होत आहे. ही मागणी गेली अनेक वर्षे केली जात आहे. परंतु याची दखल रेल्वे मंत्रालयाकडून घेतली जात नाही. खुपच ओरड वाढल्यावर या मार्गासाठी सर्वेक्षण करण्यास रेल्वे विभाग मान्यता देते पण पुढे ठोस असे काही होताना दिसत नाही. मराठवाड्याच्या विकासाला खऱ्या अर्थाने चालना देण्यासाठी हे व इतर मार्ग गतीने होण्याची आवश्यकता आहे. यासाठी मोठा संघर्ष होणे गरजेचे आहे. परळी-परभणी व परळी-हैदराबाद या दोन्ही मार्गाचे विद्युतीकरण झाले आहे. यामुळे रेल्वे सेवा अधिक गतिमान होण्यास मदत झाली आहे. परळी-परभणी, परळी-हैदराबाद या दोन्ही मार्गाचे दुहेरीकरण केले जावे ही मागणीही केली जात आहे. परंतु या मागणीची अद्याप रेल्वे मंत्रालयाने दखल घेतलेली नाही. या मागणीपूर्वी औरंगाबाद-परभणी या मार्गाचे दुहेरीकरण व्हावे म्हणून सातत्याने संघर्ष केला गेला. अखेर या मार्गाच्या दुहेरीकरणाला केंद्र सरकारने हिरवा झेंडा दाखवला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली आर्थिक व्यवहार विभागाच्या मंत्रिमंडळीय समितीने नुकतीच रेल्वे मंत्रालयाच्या एकूण ११ हजार १६९ कोटी रूपयांच्या प्रकल्पांना मंजुरी दिली आहे. यात औरंगाबाद-परभणी रेल्वे मार्गाच्या दुहेरीकरणाचा समावेश आहे. १७७ किलोमीटरचे हे अंतर असून यासाठी दोन हजार १७९ कोटी रूपये खर्च येणार आहे. २०२९ पर्यंत हे काम पूर्ण होईल असे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. यामुळे रेल्वेच्या फेऱ्या वाढण्यास मोठी मदत होणार आहे. दरम्यान या मार्गाच्या मंजुरी बरोबरच औरंगाबाद-मनमाड, नागपूर-इटारसी या मार्गालाही अशी मंजुरी देण्यात आली आहे. यामुळे महाराष्ट्रात रेल्वेच्या विकासाला चालना मिळण्यास मदत होणार आहे. औरंगाबाद-परभणी या दुहेरीकरणामुळे रेल्वे प्रवाशांबरोबरच मराठवाड्यातील विशेषतः औरंगाबाद, जालना येथील उद्योगाला मोठी चालना मिळणार आहे. केंद्र सरकारने या प्रकल्पाला मंजुरी दिल्यामुळे मराठवाड्यातील जनता सरकारचे धन्यवाद व्यक्त करत आहे. खऱ्या अर्थाने मराठवाड्याचा विकास होण्यासाठी मागणी होत असलेले रेल्वे मार्ग, रेल्वे गाड्या, रेल्वे स्थानकांचे प्रश्न तसेच परळी-बीड-नगर या मार्गाला गती देणे हे प्रश्न मार्गी लागणे गरजेचे आहे. यासाठी इथल्या नेत्यांनी दिल्ली दरबारी व्यापक लढा देण्याची आवश्यकता आहे. ***

*** सुविचार ***

**स्वार्थी लोक आणि रस्त्यावरची धूळ सारखीच असते, ज्या बाजूने हवा येईल त्या बाजूला ते पळतात..!**

# नाशिकची नारोशंकराची घंटा..


**नाशिक शहरातील अत्यंत पुरातन समजल्या जाणाऱ्या नारोशंकर मंदिरावर असलेल्या घंटेच्या निमिर्तीला ३०४ वर्षे पूर्ण झाली असून, ही घंटा १७२१ सालात तयार करण्यात आली आहे. यंदा २०२५ मध्ये तिला ३०४ वर्षे पूर्ण झाले आहेत.**

घंटेवर १७२१ साल कोरलेले असून, ही घंटा पोर्तुगीज कारागिरांनी तयार केलेली आहे. यावर युरोपियन व अरेबियन लिपीत काही अक्षरे लिहिली आहेत. थोरले बाजीराव पेशवे यांचे बंधू चिमाजीअप्पा पेशवे यांनी पोर्तुगीजांविरुद्ध झालेल्या लढाईत १७३८ मध्ये वसईमधून विजयानंतर ही घंटा आणली. ही घंटा मराठ्यांच्या विजयाचे व पराक्रमाचे प्रतीक मानले जाते. तेव्हा एकूण तीन घंटा आणण्यात आल्या होत्या. पैकी एक नाशिकच्या नारोशंकर मंदिरात, दुसरी भीमाशंकर मंदिरात तर तिसरी घंटा पिलाजीराव जाधव यांनी सासवडच्या भैरवनाथ मंदिरात दिली आहे.

या घंटा काशाच्या धातूपासून बनविल्या आहेत. कासे हा धातू कथिल, तांबे व जस्त यांच्या मिश्रणाने तयार केला जातो हा धातू कधीही न गंजणारा असतो.

नारोशंकराच्या मंदिरावर असलेली घंटा आजही सुस्थितीत असून, पर्यटकांच्या आकर्षणाचे केंद्रबिंदू ठरत आहे. नारोशंकराच्या मंदिरात स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर, लॉर्ड माउंट बॅटन, श्री श्री रविशंकर अशा अनेक मान्यवरांनी भेटी दिल्या असून, १७४७ साली सरदार नारोशंकर राजेबहाद्दर यांनी १८ लाख रुपये खर्च करून नारोशंकराचे मंदिर बांधले. घंटा वसईच्या विजयानंतर १७४० साली आणली, परंतु, ती घंटा वसईचे सुभेदार फडके यांच्याकडे ठेवली होती. कार्यबाहुल्यामुळे नारोशंकर यांनी १७५७ मध्ये नाशिकला स्थायिक झाल्यावर ही घंटा हत्तीवर आणून मंदिरात बसवली.

नदीला पूर आल्यानंतर या घंटेचा आवाज तीन किलोमिटर लांब आवाज जात असे. नारोशंकराच्या मंदिराला पूर्वी 'रामेश्वर मंदिर' म्हणून ओळखले जात होते. हे मंदिर बांधण्यासाठी राजस्थान व गुजरात येथून कुशल कारागीर आणण्यात आले. मंदिर ३७.७९ मीटर बाय २५.२९ मीटर आवारात बांधले गेले असून, त्याच्या चारही बाजूंनी ५.५ मीटर उंचीचा संरक्षक कोट बांधला




आहे. गोदावरीच्या पुरातून संरक्षण होण्यासाठी हा कोट बांधला आहे. चारही कोपऱ्यात बुरुज आहेत. मंदिर उत्तर हिंदुस्थानी नागरशैलीत बांधलेले आहे मंदिर अत्यंत भव्य व सुंदर असून, स्थापत्य कलेचा उत्तम नमुना आहे. मंदिराचे मुख्य शिखर २६ मीटर उंचीचे असून, त्यावर पौराणिक प्रसंग, हत्ती, सिंह प्राण्यांची शिल्पे कोरली आहेत.

**दगड मारल्याने घंटेला तडा:-** या घंटेला अज्ञात व्यक्तीने काही वर्षांपूर्वी दगड मारला. त्यामुळे या घंटेला तडा गेला. यावेळी राजेबहाद्दर कुटुंबीयांनी मूर्तिकारांची मदत घेऊन घंटेची दुरुस्ती केली. त्याचबरोबर यातील लोलक हा सुमारे १० किलोचा आहे. येणारे पर्यटक कुतुहलाने तो हलवत होते, त्यामुळे परिसरात आवाज येत असल्याने हा लोलक काढून ठेवण्यात आला आहे.

**महापुराचा इशारा:-** या घंटेला पुराचे पाणी लागल्यानंतर लोलक पाण्याच्या लाटेमुळे हालत होता. त्यातून जो आवाज निर्माण व्हायचा त्यातून शहराला पाण्याची पातळी समजायची. या घंटेचा आवाज हा तीन किलोमिटरपर्यंत पोहचत असे. दरम्यान, नाशिक महापालिकेचे बोधचिन्ह म्हणूनदेखील या घंटेचा वापर करण्यात आला आहे. महानगरपालिकेच्या बोधचिन्हावर घंटेचे चित्र वापरले गेले आहे. महापालिकेच्या प्रत्येक कागदावर या घंटेचे चित्र पहायला मिळते.

नारोशंकर मंदिराच्या घंटेचा परिघ सहा फूट, व्यास १०० सेंटिमीटर आणि उंची १०७ सेंटिमीटर

घंटेवरची कडी ७ सेंटिमीटर असून, वजन २० मण, याचा लोलक १० किलोचा असून, त्याला तीन कड्या आहेत.

**-प्रशांत मुळे, नाशिक**

**'परळी परिसर'** हे साप्ताहिक मुद्रक, प्रकाशक, मालक एस.एल.वाकडे यांनी न्यू सुधांशू प्रिंटर्स, श्रीनाथ चित्र मंदिरमागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, ता.परळी वैजनाथ, जि.बीड ४३१५१५ (महाराष्ट्र) येथे छापून तेथेच प्रकाशित केले. संपादक एस.एल.वाकडे.मो.९४२२३२८४९३. e-mail : parliparisar2017@gmail.com (या साप्ताहिकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या व लेखास संपादक सहमतच असतील असे नाही.)
RNI No.-MAHMAR/2017/74640 Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25 (सर्व वाद परळी न्यायकक्षेत) www.parliparisar.com

# अखिल भारतीय आयुष पदव्युत्तर प्रवेश परीक्षेत डॉ.प्रगती चौधरी भारतातून पाचवी

परळी वैजनाथ (बातमीदार):- शहरातील माणिकनगर भागातील प्रगती बालासाहेब चौधरी आपल्या अत्यंत गरीब, कठीण परिस्थितीतून वडीलांचे छत्र हरवल्यानंतरही मेहनत व कष्टाने डॉक्टर बनली व आता एमडीसाठी घेण्यात आलेल्या अखिल भारतीय आयुष पदव्युत्तर प्रवेश परीक्षेत भारतात ५ वी आली आहे. याबदल येथील तेली समाज व महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेच्या वतीने तिचा शाल, पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला.

शहरातील शिवाजीनगर परिसरात चौधरी कुटुंब राहते. या कुटूबातील सदस्य घरची परिस्थिती बेताची असल्याने इतरत्र काम करतात. याच कुटुंबातील बालासाहेब चौधरी हे मंडप डेकोरेशनचा व्यवसाय सुरू केला. व्यवसायात जम बसवत असतानाच अगदी तरुण वयातच हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला. बालासाहेब यांना एक मुलगी, एक मुलगा होता. तिचा व कुटुंबाचाभार आई ज्योती चौधरी यांच्यावर आला. ज्योती यांनी आपल्या मुलाला व मुलीला शिक्षणासाठी काही कमी पडणार नाही याची काळजी घेतली. प्रगतीचे १ ते १० वी पर्यंतचे शालेय शिक्षण शहरातील फाउंडेशन हायस्कूलमध्ये पूर्ण झाले. याच काळात वडीलांचा मृत्यू झाला. घरच्या कठीण परिस्थितीमुळे पुढील शिक्षण पूर्ण



करता येईल का नाही तसेच प्रगतीने डॉक्टर बनण्याचे ध्येय ठरवले होते. पण वडीलांच्या मृत्यूमुळे हे पूर्ण होईल का नाही ? असा प्रश्न निर्माण झाला होता. पण जिद्द, कष्ट व मेहनतीने पुढील शिक्षण पूर्ण केले. १० वी नंतर उच्च माध्यमिक शिक्षणासाठी देवगिरी कॉलेज, छत्रपती संभाजीनगर येथे प्रवेश घेतला. याच ठिकाणी सीईटी व वैद्यकीय प्रवेशासाठी असलेली नीट परिक्षेची तयारी सुरू केली. २०१८ मध्ये शासकीय आयुर्वेद महाविद्यालय,धाराशिव येथे बीएएमएससाठी प्रवेश मिळाला. २०२४ मध्ये आपल्या आई व कुटुंबातील सदस्यांच्या सहकार्याने अत्यंत कष्टाने, मेहनतीने, चिकाटीने आपले वैद्यकीय शिक्षण पूर्ण करुन डॉक्टर बनण्याचे ध्येय साध्य केले. यानंतर डॉ प्रगतीने एमडी होण्यासाठी असलेल्या अखिल भारतीय आयुष पदव्युत्तर प्रवेश दिली. या परीक्षेचा निकाल बुधवारी (ता.३०) लागला असून डॉ प्रगती या परिक्षेत भारतात ५ वी आली आहे. याबदल डॉ प्रगतीचे सर्वत्र कौतुक होत आहे. याबदल येथील तेली समाज व महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेच्या वतीने तिचा शाल, पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला. यावेळी जिल्हाध्यक्ष संगमेश्वर फुटके, सचिव प्रा मधुकर शिंदे, शनैश्वर प्रतिष्ठानचे अध्यक्ष शिवशंकर जठार, महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेचे नांदेड विभागाचे उपाध्यक्ष प्रा प्रविण फुटके, ईश्वर राऊत, गोकुळ चौधरीसह आदी उपस्थित होते. यासंदर्भात डॉ प्रगती बालासाहेब चौधरी यांनी सांगितले की, माझ्या अनुभवातून एवढेच सांगू इच्छिते की परिस्थिती प्रतिकूल जरी असेल तर जिद्द व चिकाटी ने कुठे ही न थकता त्यावर मात करून आपला मार्ग आपणच तयार करावा लागतो यश आपोआप मिळते. ***

# संत जगमित्र मंदिरात ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन

परळी वैजनाथ, (बातमीदार):- संत श्री ज्ञानेश्वर महाराजांचे ७५० वे अवतरण महोत्सवीवर्ष व श्रीकृष्णजन्माष्टमीचे निमित्त महाकैवल्यतेजोनिधि श्री ज्ञानेश्वरमहाराज यांच्या अवतरणाला येत्या श्रावण वद्य अष्टमीला - गोकूळ अष्टमीला ७५० वर्षे पूर्ण होत आहेत. संत श्री जगमित्र नागामहाराज हे श्री ज्ञानदेवांचे समकालीन असून श्री ज्ञानदेवांविषयी त्यांची श्रद्धा सर्वविदित आहे . हा जन्माष्टमीचा सोहळा येथे प्रतिवर्षी साजरा होतच असतो.

यावर्षी हा महापर्वकाळ परळीकरांच्या जीवनात आला आहे . त्यानिमित श्री ज्ञानेश्वरमहाराजांची वाङ्मयसेवा आपल्याकडून श्री जगमित्रनागा महाराजांच्यासमोर जर घडली तर याच्यासारखे भाग्य नाही. त्यामुळे आपले जीवनही कृतार्थ होऊन जगमित्र महाराजांचीही कृपा प्राप्त होईल .

या वर्षी हा सप्ताह श्रावण वद्य ५ ते द्वादशी दि. १३ ऑगस्ट ते २० ऑगस्ट या काळात होत आहे. या ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्यात परळी व परळी परिसरातील सर्व भाविक भक्तांनी, आबाल वृद्धांनी व विद्यार्थी विद्यार्थिनींनी सहभागी होऊन श्री जगमित्र महाराजांची विशेष कृपा संपादन करावी.

ज्यांच्याकडे पारायणासाठी ज्ञानेश्वरी नाही त्यांनी संस्थान कार्यालयात तशी नोंदणी करावी. म्हणजे त्यांच्यासाठी ग्रंथ उपलब्ध करता येईल असे आवाहन संत श्री जगमित्र नागामहाराज संस्थान समितीने केले आहे. ***

# तेजस्विनी सलगरे हिची नवोदय साठी निवड

परळी वैजनाथ, (बातमीदार):- परळी तालुक्यातील ग्रामीण भागातील गुणवत्तापूर्ण शिक्षण देणारी शाळा म्हणून ओळख असलेल्या मोहा येथील महाराष्ट्र शिक्षण संस्था संचलित महाराष्ट्र माध्य व उच्च माध्यमिक विद्यालयाची विद्यार्थ्यांनी कु.तेजस्विनी नीलकंठ सलगरे हिची



नवोदय विद्यालयाकरिता निवड झाली आहे.

महाराष्ट्र शिक्षण संस्था मोहा संचलित महाराष्ट्र माध्य व उच्च माध्यमिक विद्यालय स्पर्धा परीक्षेत घवघवीत यश संपादन करत आपली वेगळी ओळख निर्माण करत आहे. शाळेतील इयत्ता ९ वि वर्गात शिक्षण घेत असलेली कु.तेजस्विनी नीलकंठ सलगरे हिची नवोदय विद्यालयकरिता निवड झालेली असून तेजस्विनी सलगरे ही इयत्ता ५ वि आणि ८ वि वर्गाची स्कालरशिप परीक्षा, ८ वि वर्गाची एनएमएमएस या सर्व स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण झालेली आहे. या शैक्षणिक वर्षात शाळेतील दोन विद्यार्थिनी नवोदय विद्यालय प्रवेशकरिता पात्र झाल्या असून स्कालरशिप, एमटीएस, एनएमएमएस यासारख्या विविध स्पर्धा परीक्षेत शाळेतील असंख्य विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक यश संपादन केले आहे. कु.तेजस्विनी सलगरे हिच्या या यशाबद्दल तिच्या या यशाबद्दल संस्थेचे सचिव एड.अजय बुरांडे, सर्व संचालक मंडळ, शाळेचे प्राचार्य मुरलीधर बोराडे, शालेय प्रशासन, स्पर्धा परीक्षा विभागाचे सर्व सदस्य यांनी तिचे अभिनंदन करत पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. ***

# महसूल विभागांच्या विविध योजनांचा लाभ नागरिकांनी घ्यावा-जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

बीड, (जिमाका):- राज्यभरात महसूल विभागामार्फत ०१ ऑगस्ट ते ०७ ऑगस्ट या कालावधीत महसूल सप्ताह साजरा करण्यात येणार आहे. महसूल व वन विभागाच्या कालच्या (मंगळवार, ता.२९ जुलै) शासन निर्णयानुसार हा सप्ताह विविध उपक्रमांनी बीड जिल्ह्यात साजरा केला जाणार आहे. जिल्ह्यातील जनतेने या कार्यक्रमांमध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे. या सप्ताहादरम्यान महसूल विभागाच्या योजना, कामांची माहिती जनतेपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे. नागरिकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले आहे.

महसूल सप्ताहातील कार्यक्रम :

०१ ऑगस्ट: ''महसूल दिन साजरा करणे व महसूल सप्ताहास शुभारंभ'' तसेच ''महसूल संवर्गातील कार्यरत/सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी संवाद, उत्कृष्ट अधिकारी / कर्मचारी पुरस्कार वितरण व मान्यवरांच्या हस्ते लाभार्थ्यांना विविध प्रमाणपत्र वितरण''

०२ ऑगस्ट: ''शासकीय जागेवर सन २०११ च्या पूर्वीपासून रहिवासी प्रयोजनार्थ अतिक्रमण असलेल्या कुटुंबांपैकी अतिक्रमण नियमानुकूल करण्यास पात्र असलेल्या कुटुंबांना सदर अतिक्रमित जागांचे पट्टे वाटप करण्याबाबत कार्यक्रम''

०३ ऑगस्ट: ''पाणंद/शिवारस्थळांची मोजणी करून त्यांच्या दुतर्फा झाडे लावणे'' ०४ ऑगस्ट: ''छत्रपती शिवाजी महाराज महसूल अभियान प्रत्येक मंडळानिहाय राबविणे'' ०५ ऑगस्ट: ''विशेष सहाय्य योजनेतील डीबीटी न झालेल्या लाभार्थ्यांना घरभेटी करून डीबीटी करून अनुदानाचे वाटप करणे'' ०६ ऑगस्ट : ''शासकीय जमिनींवरील अतिक्रमण निष्कासित करणे व त्या अतिक्रमणमुक्त करणे तसेच शर्तभंग झालेल्या जमिनींबाबत शासनानुसार (नियमानुकूल करणे/सरकारजमा करणे) निर्णय घेणे'' ०७ ऑगस्ट: ''च-डरपव धोरणाची अंमलबजावणी करणे व नवीन मानक कार्यप्रणालीप्रमाणे (डजझ प्रमाणे) धोरण पूर्वाभ्यास घेणे आणि महसूल सप्ताहाचा समारोप.'' ***

# परळीला ३ नवे नायब तहसीलदार

परळी वैजनाथ, (बातमीदार):- परळी तालुक्याला तीन नवे नायब तहसीलदार मिळाले असून, महसूल व निवडणूक विभागाच्या कामकाजात आता गती येणार आहे. माजी मंत्री आ.धनंजय मुंडे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश मिळाले असून, राज्य शासनाने अधिकृत आदेश जारी केले आहेत.

या आदेशानुसार परळी तहसील कार्यालयात महसूल विभागासाठी नायब तहसीलदार पंडित सुरवसे, निवडणूक विभागासाठी अशोक भोजने यांची तर परळी उपविभागीय अधिकारी कार्यालयात महेश वाकडे यांची नियुक्ती करण्यात

(उर्वरित पान ४ वर)

# समर्थ धोकटे याचे योगासन स्पर्धेत यश

परळी वैजनाथ (बातमीदार):- कै. रामभाऊ आणा खाडे सेवाभावी संस्था संचलित पुस येथील किरण गित्ते कनिष्ठ महाविद्यालयाचा विद्यार्थी समर्थ धोकटे यांनी बीड जिल्हास्तरीय योगासन स्पोर्ट चॅम्पियनशिप स्पर्धेमध्ये तिसरा क्रमांक पटकवल आहे. समर्थ धोकटे यांचे सर्व स्तरातून अभिनंदन करीत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



महाराष्ट्र योगासन स्पोर्ट्स असोसिएशन आणि बीड जिल्हा योगासन स्पोर्ट्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने बीड जिल्हास्तरीय योगासन स्पोर्ट चॅम्पियनशिप स्पर्धा मोठ्या उत्साहात घेण्यात आल्या. योगासन स्पर्धेत ग्रामीण, शहरी विद्यार्थी आणि युवकांचा सहभाग वाढावा, खेलो इंडिया, ऑलिम्पिक साठी खेळाडू तयार व्हावेत, तसेच सर्वत्र मानसिक व शारीरिक तंदुरुस्तीसाठी योगाचा प्रचार व्हावा यासाठी या स्पर्धा घेतल्या जातात. नुकत्याच पार पडलेल्या बीड जिल्हास्तरीय योगासन स्पोर्ट चॅम्पियनशिप स्पर्धे मध्ये कै. रामभाऊ आणा खाडे सेवाभावी संस्था संचलित पुस येथील किरण गित्ते कनिष्ठ महाविद्यालयाचा विद्यार्थी समर्थ धोकटे यांनी बीड जिल्हास्तरीय योगासन स्पोर्ट चॅम्पियनशिप स्पर्धेमध्ये तिसरा क्रमांक पटकवल आहे. त्यांच्या यशाबद्दल कै. रामभाऊ आणा खाडे सेवाभावी संस्था अध्यक्ष तथा नाथ शिक्षण संस्थेचे सहसचिव प्रदीप खाडे व किरण गित्ते कनिष्ठ महाविद्यालयातील सर्वांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. ***

# श्रावण महिन्यात स्थानिकांसाठी विशेष दर्शनाची सोय व्हावी-ॲड.मनोज संकाये

परळी वैजनाथ (बातमीदार):- श्रावण महिना हा भक्तांसाठी अत्यंत पवित्र आणि महत्त्वाचा असतो. या महिन्यात देशभरातून लाखो भाविक परळी वैजनाथ येथे भगवान वैद्यनाथाच्या दर्शनासाठी येतात. मात्र, स्थानिक नागरिकांना या गर्दीतून दर्शन घेणे अनेकदा कठीण होते. त्यामुळे स्थानिकांसाठी वेगळी व विशेष दर्शनाची व्यवस्था करण्यात यावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते ॲड. मनोज संकाये यांनी वैद्यनाथ देवस्थान ट्रस्टकडे केली आहे.

सध्या श्रावण महिन्यात दररोज हजारो भाविक मंदिरात दर्शनासाठी येत असून, रांगा काही वेळा मंदिराच्या बाहेर रस्त्यांपर्यंत वाढतात. अशा परिस्थितीत परळीतील ज्येष्ठ नागरिक, व्यापारी, नोकरदार वर्ग महिलावर्ग, आणि शालेय विद्यार्थ्यांना नियमितपणे दर्शन घेणे अवघड होते. त्यांनी देवस्थान ट्रस्टकडे विनंती केली आहे की, दररोज ठराविक वेळेसाठी स्थानिक रहिवाशांसाठी स्वतंत्र रांगा किंवा विशेष दर्शन पासची सुविधा करण्यात यावी. यामुळे स्थानिक नागरिकांना त्रास न होता भक्तीभावाने दर्शन घेता येईल. देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष व पदाधिकाऱ्यांनी यावर सकारात्मक विचार करून लवकरच सकारात्मक निर्णय घेतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

स्थानिक भाविकांचे मत आहे की, अशी सुविधा झाल्यास भक्तांची गैरसोय टळेल आणि स्थानिकांनाही आपले दैवत शांततेत व श्रद्धेने पाहता येईल. ***

## दरवळणारा सुगंध...



आपल्या चेहऱ्यावरची स्माईल ही संकट काळावरची सर्वोत्तम प्रतिक्रिया असते.

आणि मौन हे चुकीच्या प्रश्नावरचे सर्वोत्तम उत्तर असते..!